---------------------------

Media Coverage – Tree Plantation drive at Chaas, Thakarwadi, Kolwadi and Kotamdaar by Maharashtra Health Department and Bharat Forge



माय पुणे जिल्हा ४ पुढारी | पुणे, शनिवार ८ जुलै २०१७

# झाडे जगविण्यास ठिबकचा वापर करणार

## चास, ठाकरवाडी, कोळवाडी, कोटमदरा येथे वृक्षारोपण

मंचर : प्रतिनिधी

आंबेगाव तालुक्यातील चास ठाकरवाडी व कोळवाडी कोटमदरा येथे महाराष्ट्र आरोग्य मंडळ पुणे व भारत फोर्ज कंपनी पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने ५०० झाडांचे रोपण करण्यात आले. ही झाडे टिकावीत यासाठी लोखंडी ट्री गार्ड तसेच झाडे जगविण्यासाठी ठिबक सिंचन प्रणालीचा वापर करणार असल्याची माहिती महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे सागर मिटकरी व भारत फोर्ज कंपनीचे जगदीप लाड यांनी दिली.

चिंच, आवळा, जांभूळ, फणस, आंबा, सीताफळ, पिंपळ, वड, रेनट्री, शिसम अशा विविध प्रकारची झाडे लावण्यात आली. ही सर्व रोपे वन विभागामार्फत शिंगे येथील रोपवाटिकेतून उपलब्ध झाली. नुसती झाडे लावण्यात आली नाहीत तर या सर्व झाडांसाठी लोखंडी ट्री गार्ड बसविण्यात आले. तसेच उन्हाळ्यामध्ये झाडे टिकावीत यासाठी सर्व झाडांना ठिबक सिंचनाद्वारे पाणी दिले जाणार आहे.

चास, ठाकरवाडी येथील कार्यक्रमास जिल्हा परिषद सदस्या तुळसी भोर, सचिन भोर, रवींद्र नामकर इत्यादी उपस्थित होते. या कार्यक्रमात भारत फोर्जच्या ७० कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. तर कोळवाडी कोटमदरा येथे डॉ. दादा गुजर पतसंस्थेच्या संचालकांनी वृक्षारोपण कार्यक्रमात सहभाग घेतला. यामध्ये अध्यक्ष अनिल गुजर, भगवान चौधरी, रवींद्र गोपाळे, भिकन पाटील, सुरेखा निकम, पवन आयवाल, दगडू शितोळे, युवराज शेवाळे, संदीप जगताप यांनी सहभाग नोंदविला. महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे कर्मचारी माधव पडवळ, अमोल झगडे, सीमा काळभोर, महादेव नरहरी, अशोक चौधरी, डॉ. शरयू कोरे, रत्नमाला पेठे, सीमा वखूर, किशोर भोर, उदयसिंह चौधरी यांनी झाडे लावण्यास मदत केली. ठाकरवाडी ग्रामस्थ साहेबराव दौरे, गोपीनाथ भांगे, शंकर भांगे, वसंत जाधव, संजीव भांगे, रोहिदास भांगे, सच्चिदं भांगे, प्रमोद घाडे, नवनाथ भांगे, शिवाजी भांगे, रामदास काळे, रामदास जाधव यांनी योगदान दिले.

चास-ठाकरवाडी येथे लोखंडी ट्री गार्ड बसविताना मान्यवर.